पुण्य नगरी
आरोग्यजागर
उत्तम आरोग्य | उज्ज्वल भविष्य | पुणे, मंगळवार, ६ ऑक्टोबर २०१५

मायस्थेनिआ ग्रेव्हीआ आणि त्यावर यशस्वी होमिओपॅथिक उपचार

होमिओपॅथी चिकित्सा व उपचार
डॉ. अमरसिंह निकम

मायस्थेनिआ ग्रेव्हीआ हा आजार आणि त्याचे नाव हे जगावेगळे आणि दुर्मिळ आहे. परंतु, जेव्हा जनमानसात प्रसिद्ध अभिनेता 'अमिताभ बच्चन' जेव्हा या आजाराने व्याधीग्रस्त झाला तेव्हा सर्वांना या आजाराबद्दल कुतूहल निर्माण झाले होते.

हा एक जुनाट स्नायुदुर्बल्य निर्माण करणारा चेतास्नायूशी निगडित आजार आहे. यामध्ये स्नायूंमध्ये हळूहळू अक्षमता येऊन थकवा निर्माण होतो. त्यामुळे ऐच्छिक स्नायूंच्या दुर्बल्यामुळे व्यक्तींच्या हालचाली मंदावतात किंवा थांबतात. हा आजार स्वायत्त प्रतिकारसंस्थेतील बिघाडामुळे होतो. स्नायूंच्या कार्यशीलतेसाठी त्यांना चेतनाशक्तीची गरज असते. प्रत्येक स्नायूला चेतापेशी जोडलेली असते. चेतापेशी स्नायूतंतूला ज्या भागात मिळते तेथून ॲसेटिलोलिन हा द्रव्य स्रवला जातो. ज्याच्यामुळे स्नायूपेषी उत्तेजित होऊन आकुंचन पावतात. परिणामी स्नायूंच्या हालचालीमुळे चालणे, उचलणे वैगेरे वैगेरे शारीरिक हालचाली घडून येतात. परंतु, स्वायत्त प्रतिकारसंस्थेच्या बिघाडामुळे हे केमिकल ग्रहण करण्यात या ग्राहकांना प्रतिपिंडामुळे अडथळा निर्माण होतो. त्यामुळे स्नायू उत्तेजित न झाल्यामुळे अशक्तपणा येतो.

लक्षणे :- वेदनाविरहित स्नायूंमध्ये दिवसभराच्या क्रियांनंतर संध्याकाळच्या वेळी थकवा जाणवतो. असा स्नायूंतील थकवा सुरुवातीला डोळ्यापासून सुरू होतो. दिवसभरातील कामे करताना थकवा जाणवतो आणि आराम केल्यानंतर बरे वाटते आणि हळूहळू हा आजार गंभीर स्वरूपाचा होऊन हातापायांमधील अशक्तपणामुळे दैनंदिन कामे करणे अडचणीचे होते.

डोळ्यांशी निगडित असलेल्या स्नायूंच्या दुर्बल्यामुळे डोळ्याची वरची पापणी नमते. त्यामुळे दिसताना दुहेरी दिसते. त्यामुळे वाचणे, लिहिणे, ड्रायव्हिंग करताना त्रास होतो. घास गिळताना त्रास होतो. जेवताना अन्न पूर्णपणे अन्ननलिकेत जात नाही किंवा अन्न घश्याशी येते. चावणे, बोलणे, गिळणे या क्रियांमध्ये अडथळा निर्माण होतो. बोलण्याशी निगडित असलेल्या स्नायूंच्या अक्षमतेमुळे बोलताना नाकातून बोलल्यासारखे, अस्पष्ट, तोतरे बोलले जाते.

चेहऱ्याचे स्नायू कमकुवत झाल्यावर हसल्यानंतर चेहरा वेडावाकडा वाटतो. बडयाच्या स्नायूंच्या कमकुवतपणामुळे तोंड उघडेच राहते. मानेच्या स्नायूंच्या अशक्तपणामुळे डोके सरळ ठेवणे अवघड होऊन बसते.

श्वसनक्रियेतील स्नायुदुर्बल्यामुळे धाप लागते. आजार बळावलेला असल्यास श्वसनक्रिया बंद पडून मृत्यू ओढावू शकतो. ताप, जंतुसंसर्ग, औषधांचे दुष्परिणाम, मानसिक ताणतणावांमुळे हा आजार बळावतो.

निदान :- या आजाराचे निदान प्रामुख्याने लक्षणांवरून केले जाते. रक्तातील ॲसेटिलकोलिन विरुद्ध तयार झालेल्या प्रतिपिंडांचे प्रमाण यावरून केले जाते.

केस - अतिगंभीर आणि अत्यवस्थ अवस्थेतसुद्धा होमिओपॅथिक औषध किती जलद काम करते हे दाखवणारी ही एक ६४ वर्षांच्या वयोवृद्धाची केस आहे ज्यांना मायस्थेनिआ ग्रेव्हीआ या आजाराच्या दुष्परिणामामुळे आयसीयूमध्ये भरती करून कृत्रिम श्वासोच्छ्वासावर ठेवले होते. गेल्या अठरा दिवसांपासून ते व्हेंटिलेटरवर होते. त्यांच्याविषयी संपूर्ण माहिती त्यांच्या पत्नीने व नातेवाइकांनी दिली.

माहिती :- त्यांच्या पत्नीने सांगितले की, गेल्या दीड वर्षापासून त्यांना सतत खोकला येत होता. तसेच अधूनमधून दम लागत होता. हळूहळू त्यांना घास गिळायला त्रास होऊ लागला. संपूर्ण शरीरात अशक्तपणा जाणवू लागला. १८ दिवसांपूर्वी त्यांना श्वास घेण्यास खूपच त्रास होऊ लागला. त्यामुळे आयसीयूमध्ये भरती करून व्हेंटिलेटर लावण्यात आला.

तक्रारी :- १. घास गिळण्यास त्रास होणे १ महिन्यापासून. २. खोकला येऊन पिवळसर कफ बाहेर पडणे. सहसा रात्रीच्या वेळी खोकला येणे, गरम पाणी प्यायलानंतर बरे वाटणे. ३. श्वास घेण्यास त्रास होणे. २० दिवसांपासून. रात्रीच्या वेळी झोपताना दम लागणे, उठून बसल्यानंतर बरे वाटणे. ४. अशक्तपणा १ महिन्यापासून. ५. बोलतानाही अडखळणे व त्रास होणे १ महिन्यापासून पूर्व आजार :- अल्बिनिझमचा त्रास म्हणजे त्वचेचा रंग पूर्णपणे पांढरा पडलेला होता.

माहिती :- १. मद्यपान व धूम्रपानाचे व्यसन. २. खाण्यात गोडाची, मांसाहाराची आवड. ३. डोळ्याची उजवी पापणी नमलेली. ४. शरीरत्वचा पांढरट पडलेली. उन्हात गेल्यावर त्वचा लालसर होणे. ५. शांत झोप न लागणे. शरीराच्या डाव्या कुशीवर झोपण्याची सवय. ६. उष्ण प्रकृती.

स्वभाव :- त्यांच्याविषयी माहिती नातेवाइकांनी दिली.

त्यांच्या कामासंदर्भात सांगा?

त्यांनी बी. कॉम.पर्यंत शिक्षण घेतले आणि पोलिस खात्यात क्लार्क म्हणून रुजू झाले. नंतर त्यांना फिंगरप्रिंट असेंसमेंटचे प्रशिक्षण देण्यात आले. त्यांच्या हाताखाली वीसजण होते. पाच वर्षांपूर्वीच ते सेवानिवृत्त झाले. ते नेहमी सांगत की मी माझ्या हाताखाली लोकांना खूप चांगल्याप्रकारे हाताळू शकतो. कोणी काही चूक केली तर त्याचे व्यवस्थापन करण्याची मला परवानगी होती. या गोष्टीचा त्यांना खूप अभिमान वाटायचा.

ते स्वतःहून सांगायचे की, मी माझ्या कामात खूप माहीर आहे आणि माझे काम मी खूप पटकन पण व्यवस्थित करू शकतो. माझ्या सहकाऱ्यांसोबत माझे खूप छान पटते.

त्यांच्या स्वभावाबद्दल सांगा?

तसा त्यांचा स्वभाव खूप शांत आहे. कोणाच्या मृत्यूची वार्ता किंवा कोणाला झालेले दुःख बघून ते दुःखी होतात. भावनिक गोष्टीवरून त्यांना रडू येते.

त्यांचे वडील त्यांच्या वयाच्या १९ व्या वर्षी गेले. त्यामुळे घरातील लहान भावंडांची जबाबदारी यांच्यावर पडली. त्यांचा खूप मोठा मित्रपरिवार आहे. मित्रांबरोबर आठवड्यातून दोनदा ते पार्टी करतात. त्यांच्या आयुष्यातील दुखद प्रसंग दोनच, एक म्हणजे वडिलांचा मृत्यू आणि दुसरे म्हणजे बहिणीचा मृत्यू.

संपूर्ण व्यक्तिमत्त्व :- १. शांत, नम्र स्वभाव. २. सोबतीची आवड ३. मद्यपानाचे व्यसन ४. सामाजिक कार्याची आवड ५. गर्विष्ठपणा ६. कुटुंबीयांविषयी काळजी ७. अशक्तपणा ८. खाण्यात गोडाची, मांसाहाराची आवड ९. उष्ण प्रकृती.

प्रतिसाद :- रुग्णाची अवस्था अतिशय गंभीर होती. आय. सी.यू.तील डॉक्टरांलनदेखील शाश्वती दिलेली नव्हती. एकच शेवटचा पर्याय म्हणून नातेवाईक माझ्याकडे आले. संपूर्ण केस बघून मी होमिओपॅथिक औषध चालू केले. औषध चालू केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी व्हेंटिलेटर अतिगंभीर अवस्थेतून कमी गंभीर माध्यमावर करण्यात आला. थोड्याच काही दिवसांनी रुग्ण स्वतःहून व्हेंटिलेटरच्या वायरी ओढू लागला. म्हणजेच रुग्ण स्वतःहून श्वास घेऊ लागला. दोन दिवसांनी रुग्णाला जनरल वॉर्डमध्ये भरती करण्यात आले. आणखी पुढच्या सात दिवसांत रुग्णाचा अशक्तपणा कमी झाला आणि रुग्ण खाऊ लागला, चालू लागला. उजवा डोळा जो आपोआप बंद होत असे तो पूर्ववत झाला. सहा महिन्यांनी रुग्ण एकटाच माझ्या दवाखान्यात फेरतपासणीसाठी आला. त्यावेळेस रुग्णाने सांगितले की, मी आता दररोज दीड तास फिरायला जातो. शरीराचा बराचसा भाग जो अल्बिनिझम या आजाराने पांढरट झाला होता, तोदेखील कमी झालेला होता.

सप्टेंबरमध्ये डेंग्यूचे सर्वाधिक रुग्ण

पुणे : प्रतिनिधी

महापालिकेच्या आरोग्य विभागातर्फे वर्षाच्या सुरुवातीपासून देण्यात आलेल्या माहितीनुसार आत्तापर्यंत सप्टेंबर महिन्यामध्ये सर्वाधिक डेंग्यूचे रुग्ण आढळले आहेत. या रुग्णांमध्ये दैनंदिन आठ रुग्णांची भर पडत असून, आठवड्याला ३८ रुग्णांची तपासणी केली जात आहे.



महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या माहितीनुसार जानेवारीपासून आतापर्यंत पुण्यात ५९६ संशयित डेंग्यू रुग्ण आढळले. त्यापैकी सर्वाधिक सप्टेंबरमध्ये २९० रुग्ण आढळले आहेत. जानेवारीपासून जून महिन्यापर्यंत रुग्णांची संख्या ११ च्या पुढे गेली नाही. मात्र, जुलैपासून शहरातील संशयित डेंग्यू रुग्णांची संख्या वाढू लागली. जुलैत ७५ तर ऑगस्टमध्ये १५६ तर सप्टेंबरमध्ये ती थेट २९० वर पोहचली. दिवसेंदिवस या संशयीत रुग्णांमध्ये वाढ होत आहे.

ताप येणे, बारीक थंडी भरून येणे, प्रचंड अंगदुखी, हाडे प्रचंड दुखणे ही डेंग्यूची ओळखता येतील अशी लक्षणे आहे. ताप आल्यावर रुग्णाच्या रक्तातील 'प्लेटलेट काऊंट' कमी-कमी होऊ लागते. या प्लेटलेट २० हजार किंवा त्याहून कमी झाल्यास ते धोकादायक ठरू शकते. तसेच १० हजारांहून प्लेटलेट काऊंट कमी झाल्यास बाहेरून प्लेटलेट द्याव्या लागू शकतात. सध्या दिसणाऱ्या डेंग्यूच्या साथीत मात्र रुग्णांमध्ये १० हजारपर्यंत प्लेटलेट काऊंट खाली जाणे जवळपास दिसत नसल्याचे निरीक्षण फिजिशियन डॉ. अविनाश भोंडवे यांनी नोंदवले. ते म्हणाले, सध्याची डेंग्यूची साथ खूप गंभीर स्वरूपाची दिसत नाही, परंतु आपल्याला डेंग्यू झाल्याचे समजताच रुग्ण घाबरून जाऊन रुग्णालयात दाखल होण्याचा आग्रह धरतात. ज्या रुग्णास मधुमेह किंवा कर्करोग असे इतर आजार असतात त्याला कोणत्याही इतर आजारात त्रास होऊ शकतो.

पालिकेच्या आरोग्य विभागात सध्या नव्याने ३७ संशयीत रुग्णांची नोंद झाली आहे. गेले चार ते पाच दिवस पडत असलेला पाऊस व त्याच्या साचलेल्या पाण्यामध्ये डेंग्यूचे डास उत्पन्न होण्यासाठी पोषक वातावरण आहे. आपल्या घराच्या व सोसायटीच्या गच्चीवर साचलेले पाणी तसेच इतर कोणत्याही ठिकाणी पाणी साचू न देण्याच्या सूचना पालिकेच्या आरोग्य विभागाने दिल्या आहेत.

चार्ली-चॅप्लिनने दिला व्यसनमुक्तीचा संदेश

पुणे : प्रतिनिधी

दारू सोडा, आरोग्य जोडा... व्यसनमुक्त व्हाल, तर माणूस म्हणून जगाल... दैवानं दिलं आणि व्यसनानं नेलं...एक घोट मजेचा, आयुष्याच्या सजेचा... नशा छोडो, घरको जोडो... अशा वाक्यांमधून व्यसनी व्यक्तीच्या हातातील दारूची बाटली हिसकावून घेत नारळाचे पाणी देऊन व्यसनमुक्त होण्याचा संदेश चॅर्ली-चॅप्लिनने दिला. सिग्नलवर थांबलेल्या वाहनचालकांना व्यसनाधिनतेचे दुष्परिणाम समजावून सांगण्यासोबतच पथनाट्य सादर करुन व्यसनमुक्ती अभियान अनोख्या पद्धतीने राबविण्यात आले.

निमित्त होते, गुडलक चौक येथे महात्मा गांधी जयंती सप्ताहानिमित्त आनंदवन व्यसनमुक्ती केंद्र व मराठवाडा मित्रमंडळ कॉलेज ऑफ कॉमर्सच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्यसनमुक्ती जनजागृती अभियानाचे. यावेळी केंद्राचे अध्यक्ष डॉ. अजय दुधाणे, राजन चांदेकर, श्रावणबाळ फाउंडेशनचे अनिल बिडलान, महेश वाडेकर, विवेक कदम, समीर पोतदार, प्रकाश धिडे, सुमीत बांदल, प्रदीप खर्से, अभिषेक जाधव, अनिकेत कुंभार आदी उपस्थित होते. एन.एस.एस.च्या विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला. चॅर्ली-चॅप्लिनच्या भूमिकेत वरप्रभ शिरगावकर आणि रवी ओव्हाळ या कलाकारांनी जनजागृती केली. नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत अभियानाला पाठिंबा दिला.

स्वाइन फ्लूच्या बळींची संख्या १३२

पुणे : प्रतिनिधी

शहरात व परिसरातील स्वाइन फ्लूचा प्रसार वाढला असून, मृत्यू होणाऱ्या रुग्णांच्या संख्येतही भर पडत आहे. स्वाइन फ्लूमुळे मृत्यू झालेल्या रुग्णांची संख्या १३२ वर पोहोचली आहे. सध्या सरकारी व खासगी रुग्णालयांत मिळून स्वाइन फ्लूची बाधा झालेले २६ रुग्ण उपचार घेत आहेत. गेल्या काही दिवसांपासून पडत असलेला पाऊस व ढगाळ वातावरणामुळे स्वाइन फ्लूच्या रुग्णांच्या संख्येत अचानक वाढ होऊन, एकूण पॉझिटिव्ह रुग्णांची संख्या १०६१ वर पोहोचली आहे.

सध्या विविध रुग्णालयांत १० रुग्ण अत्यवस्थ आहेत. ढगाळ वातावरण स्वाइनच्या विषाणूंमध्ये वाढ होण्यासाठी पोषक असते. परिणामी स्वाइनच्या रुग्णांमध्येही वाढ झाली आहे. त्यामुळे सर्व नागरिकांनी आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन पालिकेच्या आरोग्य विभागातर्फे करण्यात आले आहे. सध्या मृतांची संख्या एकूण १३२ झाली आहे. त्यापैकी पालिका हद्दीतील ४५, तर बाहेरून उपचारासाठी आलेल्यांची संख्या ८७ वर पोहोचली आहे. शहरातील विविध रुग्णालयांच्या १६ वॉर्डांमध्ये १० रुग्णांची स्थिती अत्यवस्थ असून, आज पुन्हा नव्याने चौदा संशयित रुग्णांची नोंद झाली आहे. पुणे महापालिकेची आणि शहरातील इतर खासगी रुग्णालयांतील मिळून आज एकूण १३८८ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यांपैकी १९७ जणांना टॅमि फ्लूच्या गोळ्या देण्यात आल्या आहेत.

अत्याधुनिक यंत्रांसाठी दानशूरांनी पुढाकार घ्यावा : डॉ. चंदनवाले

पुणे : प्रतिनिधी

ससून सर्वोपचार रुग्णालय हे सर्वसामान्य रुग्णांचे हक्काचे रुग्णालय व्हावे यासाठी त्याचे सध्या आधुनिकीकरण सुरु आहे. रुग्णांवर उपचार करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानांनी उपयुक्त उपकरणांची अत्यंत आवश्यकता आहे. अशा पद्धतीचे उपकरण रुग्णालयास उपलब्ध करुन देण्यासाठी विविध उद्योग समूह, स्वयंसेवी संस्था आणि दानशूर व्यक्तींनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन ससूनचे अधिष्ठाता डॉ. अजय चंदनवाले यांनी केले.

ससून सर्वोपचार रुग्णालयातील शस्त्रक्रियागृहांच्या व अतिदक्षता विभागांच्या निर्जंतूकीकरणासाठी आवश्यक असलेल्या फॉगर मशीनचा लोकार्पण सोहळा नुकताच पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. सामाजिक कार्यकर्ते शंतनू कुलकर्णी, विरेंद्र गायकवाड, नरेंद्र दरवडे, चंद्रकांत अवचरे आणि नवतरुण मित्र मंडळ यांच्या संयुक्त देणीद्वारे डॉ. अजय चंदनवाले यांच्याकडे सुपुर्द करण्यात आली. याप्रसंगी वैद्यकिय अधिक्षक डॉ. अजय तावरे, डॉ. सोमनाथ सलगर, डॉ. विद्या केळकर, हरिष टाटीया आदी उपस्थित होते.

ससून रुग्णालयात प्रत्येक महिन्याला दोन ते अडीच हजार शस्त्रक्रिया होतात. सर्व विभागांचे पारंपरिक पद्धतीने निर्जंतूकीकरण करताना महत्त्वाचे सर्व विभाग १० ते १२ तास बंद ठेवावे लागत असे. शिवाय रुग्णांची व नातलगांच्या डोळ्यांची जळजळ, डोळे लाल होणे, घशाची खवखव अशा प्रकारचे त्रास उद्भवत असत. मात्र, सध्या नव्याने मिळालेल्या फॉगरमधशीनद्वारे निर्जंतूकीकरण करताना केवळ ४० मिनीटे लागतात व कोणत्याही प्रकारचा त्रास होत नाही. त्यामुळे आधुनिक सेवा दानशूर व्यक्तींनी व संस्थांनी पुढाकार घ्यावा, असे डॉ. चंदनवाले म्हणाले.

निरोगी शरीर हीच खरी संपत्ती

राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष कामठे यांचे प्रतिपादन

कोंढवा : प्रतिनिधी

सध्याच्या युवापिढीने पैसा व संपत्तीच्या मागे न धावता शरीर संपदा कमवावी, निरोगी व सुदृढ शरीर हेच आपल्या आयुष्याची खरी संपत्ती असून ती शेवटपर्यंत टिकेल यासाठी तरुणांनी आळस न करता व्यायामाकडे लक्ष द्यावे, असे आवाहन राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष जालिंदर कामठे यांनी केले आहे.

आमदार योगेश टिळेकर यांच्या विकास निधीतून कोंढवा बुद्रुक प्रभाग क्र. ६२ मधील स्वामी विवेकानंद उद्यानात ओपन जिमचे उद्घाटन कामठे यांच्या हस्ते करण्यात आले, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार योगेश टिळेकर, माजी नगरसेविका रंजना टिळेकर, संभाजी कामठे मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार योगेश टिळेकर म्हणाले की कोंढवा भागातील नियमित व्यायाम करणाऱ्या युवकांसह ज्येष्ठांना व्यायाम करण्यासाठी पुरेशी जागा नसल्याने मोठी अडचण येत होती. त्यामुळे स्वामी विवेकानंद उद्यानात ओपन जिम उभारल्याने याचा सर्वांना फायदा होणार आहे. त्यामुळे सर्वांनी शरीर संपदा कमवावी, असे ते म्हणाले.

विवाहित पुरुषांमध्ये कमजोरी ?

विवाहित पुरुषांमध्ये कमजोरी तणाव, लहानपणीच्या वाईट सवयची कमजोरी (unbalanced diet) असमतोल आहारामुळे, ही सर्व कारणे कारणीभूत असू शकतात जे तुमच्या जीवनात उत्साहाचे क्षण हिरावून घेतात ज्या मुळे आत्मविश्वास कमी होणे, उदासीनता येणे, सतत थकवा जाणवणे, सर्वांगिण दौर्बल्य निर्माण होऊ शकतात. आयुर्वेदात सर्वांगिण दौर्बल्यनाशक व सप्तधातु-पोषक काही विशेष औषधांचे वर्णन आढळते. या औषधांचा विशिष्ठ शोधन व संस्कार प्रक्रिया करुन आयुरेक्स-एस कॅप्सुलची निर्मिती नर्चर हेल्थ केअरने केली आहे.

आयुरेक्स-एस
कॅप्सुल

सर्व मेडिकल स्टोर्स मध्ये उपलब्ध.

NURTURE
DIFFERENCE GURANTED !!

Medicine & its dose should be taken under medical supervision only

दमदार पावरफुल आयुरेक्स तेल स्वरुपात सुद्धा उपलब्ध.

गुप्त समस्यां
लग्नापुर्वी वा नंतर नपुंसकता, शीघ्रपतन, कमजोरी, स्त्रीयांसमोर लाजण्यापेक्षा उत्तम आहे आजच उपचार करुन घेणे. पुरूषांसाठी गुप्त रोगांच्या यशस्वी उपचारासाठी आजच फोन करुन सल्ला घ्या वा स्वतः भेटा
स्थापना 1929
हाशमी दवाखाना काझीज़ादा, बस्ती-UP
09997161320-07520246143

Proprietor Sunil Chandak
Govt Reg.No.7342

+पेन केअर सेंटर+
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अ.नगर

खालील व्याधी(आजारावर) सल्ला व उपचार
सांधेवात, गुडघेदुखी
मान, पाठ,कंबरदुखी
मायग्रेन (डोकेदुखी)
फ्रोझन शोल्डर (खांदेदुखी)
सायटीका, स्लिप डिस्क
टाचदुखी, टेनिस ऐल्बो
हातापायात मुंग्या येणे

पुणे - जंगली महाराज रोड, हॉटेल शुभमच्या पाठीमागे, दुर्गाशंकर बिल्डींग (कृपया अपॉईंटमेंट घेऊनच येणे) महिन्यातुन अल्टरनेट दोन रविवार सकाळी ८ ते ३ मो. 9420808990, 9403354523, 9822899660

विवाहापुर्वी व विवाहानंतर समस्यांसाठी सेक्स तज्ञांचा सल्ला व आयुर्वेदिक औषधी उपलब्ध

हस्तमैथुन, स्वप्नदोष, विर्यदोष, शिघ्रपतन, शिथिलता, हायपोगोनॅडिझममुळे लहान लिंग,

मधुमेहामुळे आलेली लैंगिक शिथीलता

ऑलीगोस्पर्मीया : विर्यामध्ये शुक्रजंतुची संख्या कमी असणे.
ॲझुस्पर्मीया : शुक्रजंतुची संख्या अजीबात नसणे.

आशाकिरण क्लिनीक
गुलाब पॅव्हेलीयन, दुसरा मजला,डेक्कन बस स्टॉपच्या मागे, डेक्कन, पुणे. वेळ - ११ ते ६ पर्यंत.
7875451644, 8657122333
औषधीसाठी. संपर्क - 7769856821